MHBI120000372025

## नियमीत दिवाणी दावा क्र.१७/२०२५ मधील नि.क्र.१२
## खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरूध्द झालेला जबाबदावा नाहीचा आदेश रद्दबातल करून त्यांचा जबाबदावा अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादीचे विरूध्द दि.१९.०७.२०२५ रोजी जबाबदावा नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादीने जबाबदावा दाखल करणेस मुद्दाम टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादीचे घरगुती अडचणीमुळे प्रतिवादीला जबाबदावा मुदतीत दाखल करता आलेला नाही. प्रतिवादीने दि.१९.०७.२०२५ रोजी जबाबदावा दाखल करणेस मुदत मिळणेकरीता अर्ज दिला होता परंतु तो नामंजूर झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा स्थावर मिळकतीविषयी असल्यामुळे प्रतिवादीस त्याचा जबाबदावा दाखल करून म्हणणे मांडण्याची संधी मिळणे नैसर्गिक न्यायास धरून होईल. सबब प्रतिवादी यांचा जबाबदावा दाखल करून घेण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल केले की, प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात दि.१५.०४.२०२५ रोजी हजर झाले असून प्रतिवादीला पुढे खूप वेळ दिलेला आहे. अर्जातील कारण संयुक्तीक नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी हे दिनांक २२.०४.२०२५ रोजी दाव्यात हजर झाले आहेत. परंतु

मुदतीत जबाबदावा दाखल करू शकलेले नाहीत. अर्जात नमुद जबाबदावा दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण योग्य वाटते. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने सदर प्रतिवादीचा जबाबदावा अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. तशी संधी न दिल्यास त्यांचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. झालेल्या विलंबाबत प्रतिवादीवर खर्च आकारणे योग्य आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रू.३००/- खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादीने वादींना पुढील तारखेपर्यंत अदा करावी.

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.02.04 17:10:08 +0530

स्थळ-धारुर (निलेश एम. वाली )

दिनांक -०४.०२.२०२६ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

धारुर

:: **Certificate of Stenographer** ::

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order/judgment. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur